| | | |
|---|---|---|
| | दाखल तारीख | २७.१२.२०१८ |
| | नोंदणी तारीख | २७.१२.२०१८ |
| | निर्णय तारीख | १०.१२.२०२४ |
| | कालावधी | ०५ व ११ म १३ दि. |
| MHSN170003632020 | **निशाणी क्र.** | **६८** |

**भाग अ**

| |
|---|
| **विटा येथील सत्र न्यायालयात** |
| पिठासीन अधिकारी : श्री. आर.आर.भागवत, अतिरिक्त सत्र न्यायाधीश विटा |
| न्यायनिर्णय तारीख - १०/१२/२०२४ |
| **सत्र खटला क्रमांक ७८/२०२४**<br>**(जुना सत्र खटला क्र.२२८/२०१८)** |
| **विटा पोलीस ठाणे गु. र. नं.३७६/२०१८** |

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | :- | महाराष्ट्र सरकार<br>पोलीस निरीक्षक विटा पोलीस ठाणे. |
| सरकार पक्षातर्फे विधीज्ञ | :- | श्री ए.एन.कुलकर्णी<br>सरकारी अभियोक्ता |
| **आरोपी** | १. | सुधीर मारूती कदम,<br>वय २५ वर्षे, धंदा शेती,<br>रा.विटा घुमटमाळ पारे रोड, ता.खानापूर,जि.सांगली |
| आरोपींतर्फे विधीज्ञ | | विधीज्ञ श्री डी.व्ही.देशमुख |

**भाग ब**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडलेली तारीख | : | २६.०७.२०१८ |
| फिर्याद दाखल तारीख | : | २७.०७.२०१८ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | : | १०.१२.२०१८ |
| पुरावा सुरु झालेची तारीख | : | ०९.०९.२०२४ |
| न्यायनिर्णयासाठी राखीव तारीख | : | १०.१२.२०२४ |
| न्यायनिर्णय तारीख | : | १०.१२.२०२४ |
| शिक्षा दिलेची तारीख (असल्यास) | : | शिक्षा नाही. |

**आरोपींची माहिती**

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटकेची तारीख | जामीनावर सोडलेची तारीख | ठेवण्यात आलेले गुन्हे | दोषमुक्त / शिक्षा | दिलेली शिक्षा | न्यायबंदी कालावधी फौ.प्र.सं.कलम ४२८ करीता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सुधीर मारुती कदम | २७.०७.२०१८ | २८.०१.२०१९ | भा.द.वि.कलम ३०७,५०६ अन्वये | शिक्षा नाही | -- | -- |

## भाग क

**(क्रिमीनल मॅन्यूअल चॅप्टर ६ परिच्छेद ४४ (iii) प्रमाणे सरकार पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयाचे वतीने घेण्यात आलेली साक्षीदारांची यादी)**

**अ - सरकार पक्ष**

| क्रमांक | निशाणी क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | २७ | जीवन मारुती कदम | जखमी |
| अ.सा.क्र.२ | ३० | मारुती साधू कदम | जखमी |
| अ.सा.क्र.३ | ३२ | रमेश उत्तम पाटील | साक्षीदार |
| अ.सा.क्र.४ | ३५ | अशोक माधवराव कदम | साक्षीदार |
| अ.सा.क्र.५ | ४९ | धनाजी भगवान पिसाळ | तपासी अंमलदार |

**बचाव पक्षाचे वतीने तपासलेले साक्षीदार**

| क्रमांक | निशाणी क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| -- | -- | -- | -- |

**अभियोग पक्षातर्फे दाखल व निशाणी झालेली कागदपत्रे**

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| १. | २८/सा.१ | सा.क्र.१ च्या जबाबावरील सही |
| २. | २९/सा.१ | सा.क्र.१ च्या जबाबावरील अंगठा |
| ३. | ३१/सा.२ | सा.क्र.२ च्या जबाबावरील सही |
| ४. | ३६/मान्य | घटनास्थळ पंचनामा |
| ५. | ३७/मान्य | अंगझडती पंचनामा |
| ६. | ३८/मान्य | जप्ती पंचनामा |
| ७. | ३९/मान्य | एम.एल.सी.पेपर्स |
| ८. | ४०/मान्य | प्रिस्क्रीप्शन |

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| ९. | ४१/मान्य | ॲनॅलेसीस रिपोर्ट |
| १०. | ४२/मान्य | वैदयकीय प्रमाणपत्र |
| ११. | ४३/मान्य | वैदयकीय प्रमाणपत्र |
| १२. | ५०/सा.५ | तपासाचा आदेश |
| १३. | ५१/सा.५ | मुद्देमाल पावती |
| १४. | ५२/सा.५ | मुद्देमाल पावती |
| १५. | ५३/सा.५ | मुद्देमाल पावती |
| १६. | ५४/सा.५ | सा.क्र.४ च्या जबाबातील अधोरेखित भाग अ |
| १७. | ५५/सा.५ | सा.क्र.४ च्या जबाबातील अधोरेखित भाग ब |
| १८. | ५६/सा.५ | सा.क्र.३ च्या जबाबातील अधोरेखित भाग अ |
| १९. | ५७/सा.५ | सा.क्र.२ च्या जबाबातील अधोरेखित भाग अ |
| २०. | ५८/सा.५ | सा.क्र.१ च्या जबाबातील अधोरेखित भाग अ |
| २१. | ५९/सा.५ | सीए कोल्हापूर यांना पाठविलेले पत्र |
| २२. | ६०/सा.५ | मुख्याधिकारी, विटा यांना पाठविलेले पत्र |
| २३. | ६१/सा.५ | मुख्याधिकारी, विटा यांना पाठविलेले पत्र |
| २४. | ६२/सा.५ | मंडल अधिकारी, विटा यांना पाठविलेले पत्र |
| २५. | ६३/सा.५ | वैदयकीय अधिकारी, विटा यांना पाठविलेले पत्र |
| २६. | ६४/सा.५ | वैदयकीय अधिकारी, विटा यांना पाठविलेले पत्र |
| २७. | ६५/सा.५ | कर्नाळकर हॉस्पीटल,सांगली यांना पाठविलेले पत्र |

**बचाव पक्षातर्फे शाबीत केलेले कागद**

| **अ.क्र.** | **निशाणी क्र.** | **कागदपत्राचा तपशील** |
|---|---|---|
| --- | --- | --- |

**मुद्देमाल साहित्य**

| **अ.क्र.** | **वस्तू क्र.** | **तपशील** |
|---|---|---|
| १ | अ | फोटो |

| अ.क्र. | वस्तू क्र. | तपशील |
|---|---|---|
| २ | ब | फोटो |
| ३ | क | फोटो |
| ४ | ड | फोटो |
| ५ | इ | फोटो |
| ६ | फ | फोटो |
| ७ | जी | जागेचा उतारा |
| ८ | एच | लाईट बील |

**दोषारोपः भा.द.वि.कलम ३०७, ५०६ अन्वये**

## न्यायनिर्णय

(अधिघोषीत दि. १०.१२.२०२४)

प्रस्तूत प्रकरणात आरोपीची भा.द.वि.कलम ३०७, ५०६ अन्वये संपरीक्षा घेण्यात आली.

२. **अभियोग पक्षाचे थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे आहे :-**

फिर्यादी जीवन मारूती कदम हे घुमटमाळ, विटा येथे त्याचे आई वडील व सावत्र भाऊ सुधीर मारूती कदम असे एकत्रात रहाणेस आहेत. सुधीर हा त्याची बहीण सौ.शुभांगी दिपक सुर्यवंशी हिचे पियोरागड, उत्तराखंड येथील गलाईचे दुकानात गेल्या २-३ वर्षापासून कामाला होता. त्याला कावळीचा त्रास होऊ लागल्याने एक महिन्यापूर्वी विटा येथे उपचार घेत होता. दि.२५.०७.२०१८ रोजी तो विटा येथील कूमार डॉक्टरांकडे उपचाराकरिता गेला असता त्यांनी सांगली येथील समीर गुप्ते यांचेकडे जाणेची चिठठी दिली. त्यानंतर दि.२६.०७.२०१८ रोजी फिर्यादीचे वडील व रमेश पाटील हे सुधीर यास घेऊन दवाखान्यात जाऊन आले व रात्री १०.३० च्या सुमारास तो व सुधीर असे घराचे सोप्यात झोपले असता रात्री ११.०० चे सुमारास फिर्यादीच्या डोक्यात काहीतरी मारल्याने त्याने तोंडावरील

पांघरूण काढून पाहिले असता त्याला सुधीरच्या हातात कोयता दिसला. तो पुन्हा कोयता त्याचे डोक्यात मारणार इतक्यात त्याने दोन्ही हात पुढे केले असता त्याने त्याचे हातावर वार केले. त्यामुळे त्याचे हातातून जखम होऊन रक्त येऊ लागले. त्याला मारणेचे कारण विचारले असता त्याने तुम्ही घरातील लोक दवाखान्यात डॉक्टरांना सांगून त्याला मारुन टाकणार आहात असे म्हणून मीच तुम्हाला ठार मारून टाकतो असे म्हणून पुन्हा त्याचेवर वार करत असताना फिर्यादीचे वडील मारूती साधू कदम अडवत असता त्यांनाही कोयत्याने डावे हाताचे पंजावर वार करून जखमी केले. म्हणून त्याने विटा पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली व सदरच्या तक्रारीवरुन गु.र.नं.३७६/२०१८ भा.द.वि.कलम ३०७, ५०६ अन्वये नोंदविण्यात आला.

३. सदर गुन्हयाचा तपास धनाजी भगवान पिसाळ, पोलीस निरिक्षक, विटा पोलीस स्टेशन यांनी केला. त्यांनी घटनास्थळ पंचनामा केला, घटनास्थळाचे फोटो काढले, एक लोखंडी कोयता जप्त केला. त्याच दिवशी त्याने आरोपीला अटक केली व त्याचा अंगझडती पंचनामा केला. तसेच जखमीच्या कपडे जप्तीचा पंचनामा केला. साक्षीदारांचे जबाब नोंदविले. फिर्यादी व त्याचे वडील मारूती यांचा कलम १६४ फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये जबाब न्यायालयामार्फत नोंदविले. जप्त मुद्देमाल सी.ए.कोल्हापूर कडे पाठविला. घटनास्थळाचा ८-अ चा उतारा, घटनास्थळाचा नकाशा व जखमीचे वैदयकीय प्रमाणपत्र प्राप्त केले. तपासांती आरोपीविरूध्द सबळ पुरावा मिळून आल्याने आरोपीं विरूध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले.

४. दोषारोपपत्र व पोलीस कागदपत्रांवरून आरोपींविरुध्द वर नमुद केल्या प्रमाणे दोषारोप नि.१५ वर ठेवण्यात आला. आरोपीने नि.१६ वरील जबानीप्रमाणे गुन्हा कबूल करण्यास नकार दिल्यामुळे अभियोग पक्षाचा पुरावा नोंदविण्यात आला.

अभियोग पक्षातर्फे एकूण ५ साक्षीदार तपासले. सदर पुराव्यावरून आरोपीविरुध्द पुरावा आढळून आल्याने त्यांचे कलम ३१३ फौजदारी प्रक्रिया संहिता प्रमाणे निवेदन नि.६७ वर नोंदविले. आरोपीने विरोधात जाणा-या बाबी नाकारल्या व त्याच्या बचावार्थ पुरावा देण्यास नकार दिला.

५. अभियोग पक्षातर्फे अति. सरकारी अभियोक्ता श्री ए.एन.कुलकर्णी व आरोपीचे वकील श्री डी.व्ही.देशमुख यांचा युक्तीवाद ऐकला.

६. फिर्यादी पक्षाच्या कथनावरुन व दाखल पुराव्यावरून खालील मुद्दे उपस्थित झाले असून त्यांचे निष्कर्ष त्यांच्यासमोर खालील दिलेल्या कारणामीमांसेप्रमाणे नोंदविलेले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, आरोपीने दि.२६.०७.२०१८ रोजी रात्री ११.०० वाजता घुमटमाळ, पारे रोड, विटा येथे त्याचा सावत्र भाऊ जिवन मारूती कदम याचेवर त्याला जीवे मारण्याचे उद्देशाने कोयत्याने त्याचेवर असे वार केले की ज्यामुळे त्याचा मृत्यू होऊ शकला असता? | : नाही |
| २) | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, आरोपीने फिर्यादी व साक्षीदारांना वरील नमुद ठिकाणी व वेळी जीवे मारण्याची धमकी दिली ? | : नाही |
| ३) | कोणता आदेश? | : अंतिम आदेशा-प्रमाणे |

## कारणमिमांसा

### मुद्दे क्रमांकः १ ते ३ बाबतः-

७. साक्षीदार क्र.१ जीवन हा फिर्यादी असून त्याने आरोपी सुधीरला कावीळीचा त्रास होत असल्यामुळे डॉ कुंभार व सांगली येथे उपचार केल्याचे सांगितले. त्याने पुढे असे सांगितले की दि.२६.०७.२०१८ ला तो झोपलेला

असताना कोणीतरी अचानक त्याच्या डोक्यात मारले. सदर साक्षीदार आरोपीने मारल्याचे सांगत नसल्यामुळे त्याला फितूर घोषीत करण्यात आले, परंतू त्याच्या सरकारी वकीलांनी घेतलेल्या उलटतपासणीत अभियोग पक्षाला समर्थन करणारी कोणतीही बाब आली नाही. त्याच प्रमाणे साक्षीदार क्र.२ मारूती हे आरोपी सुधीरचे वडील आहेत व ते सुध्दा अभियोग पक्षाला समर्थन देत नाहीत. साक्षीदार क्र.३ रमेश याने साक्षीदार क्र.१ जीवन याला त्याच्या रिक्षामधून दवाखान्यात नेले आहे. हा साक्षीदार घटनेविषयी प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाही. साक्षीदार क्र.४ अशोक कदम हा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असून त्याने सुध्दा अभियोग पक्षाला मदत केलेली नाही. साक्षीदार क्र.५ धनाजी पिसाळ, पोलीस निरिक्षक यांची साक्ष तपासाच्या तपशीलापुरती मर्यादित आहे व ती पुर्णत: चर्चिल्या जाण्याची आवश्यकता नाही. रेकॉर्डवरील एकंदरीत पुरावा विचारात घेता असे दिसून येते की, फिर्यादी व इतर साक्षीदार अभियोगपक्षाला समर्थन देत नाही. त्यामुळे अभियोगपक्ष आरोपीचा गुन्हा संशयातितरित्या सिध्द करण्यास अपयशी ठरलेला आहे. अभियोगपक्षाने त्यांचे प्रकरण संशयातिततरित्या सिध्द केलेले नाही. त्यामुळे मुद्दे क्र. १ व २ चे निष्कर्ष नकारार्थी देतो व मुद्दा क्र.३ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

| | |
|---|---|
| १) | आरोपी सुधीर मारुती कदम यांची फौजदारी प्रक्रिया संहिता भा.द.वि.कलम ३०७, ५०६ या दोषारोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| २) | आरोपीचा जामीन कदबा रद्द करण्यात येतो. |
| ३) | जप्त कोयता व कपडे (ज्याचे सविस्तर वर्णन दोषारोपपत्रामध्ये अ.क्र.१ ते ५ कडे करणेत आले आहे) हे विनामुल्य असल्याने ते अपील कालावधीनंतर नाश करणेत यावेत. |
| ४) | आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७-अ अन्वये अपिल कालावधीसाठी व अपील दाखल झालेस त्याकामी विनाविलंब हजर |

| | |
|---|---|
| | राहणेच्या हमीसाठी रक्कम रु.१०,०००/-चा वैयक्तीक जातमुचलका व तितक्याच रकमेचा जामीनदार सादर करावा. |
| ५) | या केसच्या निकालाची प्रत जिल्हा दंडाधिकारी, सांगली यांचेकडे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३६५ अन्वये पाठविणेत यावी. |
| ६) | से. केस क्र.७८/२०२४ ही केस निकाली करणेत आली. |

(खुल्या न्यायालयात अधिघोषीत केला)

RAVIKIRAN RAMKRISHNA BHAGWAT
Digitally signed by RAVIKIRAN RAMKRISHNA BHAGWAT
Date: 2024.12.23 16:56:15 +0530

विटा
दिनांकः १०.१२.२०२४.

**(आर.आर.भागवत)**
**अतिरिक्त सत्र न्यायाधीश, विटा**

**प्रमाणपत्र**

मी प्रमाणित करतो की, या पीडीएफ फाईलमधील मजकूर व मुळ आदेश / न्यायनिर्णय मधील मजकूर हा एकसारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | : | संजय वि.अग्निहोत्री |
| पिठासीन अधिकारी व कोर्टचे नांव | : | आर.आर.भागवत<br>अतिरिक्त सत्र न्यायाधीश, विटा |
| आदेश पारीत तारीख | : | १०.१२.२०२४ |
| आदेश/ न्यायनिर्णय टंकलेखन तारीख | : | १०.१२.२०२४ |
| आदेश/ न्यायनिर्णय अपलोड तारीख | : | १०.१२.२०२४ |